# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप /केंस क्र.६८/२०१६-१७/१७९ दिनांक : ०६-०५-२०१७

**आदेश केस क्र.६८ /१६-१७**

| | | |
|---|---|---|
| | सौ. ललीता पायगोंडा पाटील,<br>१९/११० प्रतिक प्लाझा कोल्हापूर रोड इचलकरंजी<br>पत्रव्यवहार पत्ताः-प्लाट क्र.६०२ रिषभ अपार्टमेंट मुक्त सैनिक वसाहत, कोल्हापूर | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर. | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, इचलकरंजी | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग ब इचलकरंजी | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय जाहीर करीत आहे.

१) ब-याच वर्षापूर्वी कायमपणे खंडीत केलेल्या घरगुती वीज जोडणी वरील तथाकथित थकबाकी, मुदतबाहय झाल्यामुळे कायमची रद्द करुन मिळणेबद्दल उपरोक्त तक्रारदार यांनी सदर गा-हाणे दाखल केले आहे.

**<u>तक्रारदार यांचे गा-हाणे</u>**

२) तक्रारदार सौ. ललीता पायगोंडा पाटील, रा.इचलकरंजी यांची घरगुती वीज जोडणी ग्राहक क्र. २५०३८०१५५९९७ ब-याच वर्षापूर्वी कायम स्वरुपी खंडीत केली होती.त्यावरील थकबाकीची रक्कम रु. २७,३८०/- मार्च-२००७ च्या पूर्वीची असल्याने मुदतबाहय झाली आहे. सदर थकबाकी कायमची रद्द करुन मिळणेची विनंती तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे दिनांक २८-१२-२०१६ च्या तक्रार अर्जाने केली होती. ती सदर कक्षाने दिनांक ०४-०२-२०१७च्या आदेशाने फेटाळल्यामुळे प्रस्तुत अपिल तक्रारदार यांनी या मंचासमोर दिनांक १८-०३-२०१७ रोजी दाखल केले आहे.

**<u>वि.प. यांची भूमिका</u>**

३) उपरोक्त घरगुती वीज जोडणी दि. २७-०५-१९९२ रोजी तक्रारदार यांना दिलेली होती. ती रु. २४,५३२/- इतक्या थकबाकीपोटी दि. ०१-११-२००८ रोजी कायम स्वरुपी बंद केली . तक्रारदार यांनी P.D.Amnesty Schme मध्ये भाग घेतला तर त्यांना काही प्रमाणात सवलत मिळू शकेल. वि.प. यांनी अशी विनंती केली आहे की, तक्रारदार यांना वीज बिल भरणेचा आदेश करण्यात यावा.

४) या प्रकरणाची सुनावणी दि. ०४-०५-२०१७ रोजी या मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदारतर्फे प्रितिनिधी श्री पायगोंडा पाटील आणि वि.प. तर्फे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री काळे व कार्यकारी अभियंता श्री सागर मारुळकर, हजर होते. त्यांचे युक्तिवाद ऐकणेत आले. उपलब्ध कागदपत्रे वाचण्यात आली.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदार यांचेकडून येणे दाखवलेली तथाकथित थकबाकी रक्कम आता वसूलीस पात्र आहे का?

उत्तरः- नाही.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

६) उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसते की, मे-१९९२ मध्ये तक्रारदार यांना ग्राहक क्र.२५०३८०१५५९९७ ची घरगुती वीज जोडणी देण्यात आली होती. त्यांची दिनांक २९-०३-२००७ पर्यन्तची देयके भरण्यात आली होती. तथापि, त्यानंतरची वीज देयके भरली नाहीत म्हणून रु. २४,५३२/- इतक्या थकबाकीसाठी सदर वीज जोडणी दि. ०१-११-२००८ रोजी कायमपणे बंद करण्यात आली. म्हणजेच सदर थकबाकी ऑक्टोंबर २००८ च्या पूर्वीची आहे.
त्यानंतर १५ वर्षे होऊन गेली आहेत. वीज जोडणी कायमपणे खंडीत करण्या खेरीज अन्य कोणतीही कारवाई तक्रारदार विरुध्द वि.प. यांनी केलेचे दिसून येत नाही.

७) या प्रकरणात, Indian Limitation Act १९६३ लागू होतो. असे जरी क्षणभर मान्य केले तरी वादास कारण घडल्या पासून तीन वर्षात थकबाकी वसूलीची कायदेशीर कारवाई करणेत आल्याचा काहीही पुरावा नाही. विद्युत कायदा २००३ हा अंमलात आल्यानंतर कलम ५६ प्रमाणे कारवाई करण्याचा वि.प. यांना अधिकार होता. कलम ५६(२) प्रमाणे, तथाकथित थकबाकीची रक्कम वेळोवेळी देण्यात येणा-या वीज देयकांमध्ये सततपणे, अव्याहतपणे दर्शवून दोन वर्षात रक्कम वसूल करणेबाबत कारवाई करणेत आली नाही असे दिसून येते. त्या मुदतीनंतर अशी थकबाकी मुदतबाहय होते आणि वसूलीस अपात्र ठरते. तक्रारदार यांचेकडून येणे असणारी थकबाकी ब-याच वर्षापूर्वीची आहे. त्यामुळे सकृतदर्शनी ती मुदतबाळय झालेली आहे असे या मंचाचे मत आहे.

८) युक्तिवादाचे दरम्यान असे निवेदन वि.प. तर्फे करण्यात आले की, तक्रारदार यांचे प्रतिनिधी श्री पायगोंडा पाटील महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे माजी कर्मचारी असून त्यांना P.D.Amnesty Schme मध्ये भाग घेऊन थकबाकी भरणेचा आदेश करावा.तथापि या मंचास कायद्यानुसार असा आदेश करणे शक्य होत नाही.

९) वरील सर्व परिस्थितीत , आमचे असे मत झाले आहे की, तथाकथित थकबाकी दुर्देवाने मुदतबाहय झाल्यामुळे वसूलीस पात्र नाही. सदर थकबाकी वसूलीस अद्यापही पात्र आहे असे दर्शविणारी अन्य कोणतीही कायदेशीर तरतूद मंचासमोर दाखविणेत आली नाही.

सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

## आदेश

१) तक्रारदार सौ. ललीता पायगोंडा पाटील, रा.१९/११० प्रतिक प्लाझा , कोल्हापूर रोड, इचलकरंजी,जि. कोल्हापूर यांचेकडून येणे असलेली वीज जोडणी ग्राहक क्र. २५०३८०१५५९९७ या वरील कथित थकबाकीची रक्कम मुदतबाहय झाल्यामुळे आणि वसूलीस अपात्र असल्याने रद्द करण्यात येते.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |